# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २३.०९.२०२२**

## जिल्हा : कोल्हापूर

| मागील आठवड्यातील हवामान (१७.०९.२०२२ ते २३.०९.२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२४.०९.२०२२ ते २८.०९.२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१७** | **१८** | **१९** | **२०** | **२१** | **२२** | **२३** | **दिनांक** | **२४** | **२५** | **२६** | **२७** | **२८** |
| ७ | १ | ० | ० | ० | ० | ० | **पाऊस (मिमी)** | ८ | ५ | ४ | ६ | ३ |
| २८ | ३१ | ३१ | ३० | ३१ | ३० | ३० | **कमाल तापमान (अं.से.)** | ३१ | ३१ | ३१ | ३१ | ३२ |
| २० | २१ | २१ | २० | १८ | १७.२ | १७.२ | **किमान तापमान (अं.से.)** | २१ | २१ | २२ | २१ | २१ |
| २ | ६ | ३ | ५ | २ | ३ | २ | **स. ढग स्थिती (आकाश)** | ४ | ३ | ५ | २ | ४ |
| २ | ३ | ६ | ४ | २ | १ | | **दु.** | | | | | |
| ९३ | ९५ | ९६ | ९६ | ९५ | ९४ | ९२ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)** | ९८ | ९७ | ९७ | ९७ | ९७ |
| ८२ | ८१ | ८१ | ७७ | ६९ | ८५ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)** | ६८ | ६८ | ६५ | ६४ | ६२ |
| ० | ० | ० | १ | ० | ०.१ | ०.१ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | १३ | १२ | ११ | ११ | ११ |
| नै. | - | नै. | द. | नै. | वा. | उ. | **स. वाऱ्याची दिशा** | प.नै. | प.नै. | प.नै. | प. | प. |
| द. | द.नै. | द. | प. | नै. | द. | - | **दु.** | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२२ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२२ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ८.० | १२५३.५ | ७४ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २४ ते २८ सप्टेंबर दरम्यान आकाश ढगाळ राहण्याची तर दिनांक २४ ते २८ सप्टेंबर दरम्यान काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान ३१.० ते ३२.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २१ ते २२ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ९७ ते ९८% तर दुपारची सापेक्ष आद्रता ६२ ते ६८% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ११.० ते १३.० कि.मी. पर्यंत वाढण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २५ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त तसेच कमाल तापमान व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून अँड्रॉइड अॅप्लिकेशन "मेघदूत " तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ "दामिनी" च्या अंदाजासाठी. अँड्रॉइड अॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा. |
| **संदेश** | | सर्व निरोगी जनावरांना लाळ खुरकत रोगाची प्रतिबंधक लस सप्टेंबर महिन्यामध्ये पशुवैद्यकाच्या सल्ल्याने टोचून घ्यावी. |
| **भात** | फुटवे ते पोटरी अवस्था | ➢ भात खाचरामध्ये पाण्याची पातळी अधिक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत ३ ते ५ से.मी. ठेवावी तसेच भात पोटरीच्या अवस्थेत असताना ५ ते १० से.मी. ठेवावी.<br>➢ पाने गुंडाळणाऱ्या आळीच्या जैविक नियंत्रणासाठी "ट्रायकोग्रामा चीलोणीस" या प्रजातीचे एक लक्ष प्रौढ प्रती हेक्टर आठवड्याच्या अंतराने वरील प्रमाणे चार वेळा प्रसारित करावेत.<br>➢ भात पिकावर तुडतुड्यांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी पिकावर इमिडाक्लोप्रीड २०एस.एल. (१२५ मिली) किंवा थायोमिथोक्झाम २५ डब्ल्यू. जी.(१०० ग्रम) प्रती हेक्टरी या प्रमाणात वापरावे. |
| **मूग** | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ पक्व झालेल्या शेंगांची वेळेत काढणी करावी. काढणी उशिरा केल्यास पक्व झालेल्या शेंगा तडकतात.<br>➢ पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेती मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **मका** | फुलोरा | ➢ पिकावर अमेरिकन लष्करी आळीचा १०% पेक्षा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी खालीलपैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची एकदा फवारणी घ्यावी. |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | ➢ क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. ०.४ मिली प्रति लिटर पाणी.<br>➢ किंवा स्पिनेटोराम ११.७ % एस.सी ०.५ मिली प्रती लिटर पाणी<br>➢ किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५% एस.जी. ०.४ ग्रॅम प्रती लिटर पाणी. |
| **सोयाबीन** | शेंगा भरणे | कमाल तापमान २८ ते ३२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २० ते २३ अंश सेल्सिअस आणि सकाळची आद्रता ९० पेक्षा जास्त असण्याची शक्यता असल्याने सोयाबीन पिकामध्ये पाने खाणाऱ्या आळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना कराव्यात.<br>➢ प्रतिबंधात्मक उपाय म्हणून हेक्टरी ५ याप्रमाणे स्पोडोप्लुरचा वापर करून फिरोमोन सापळे लावावेत.<br>➢ एस.एल.एन.पी.व्ही ५०० एल ई अथवा एन्डोकझाकार्ब १५.८% ई.सी.६.६ मिली १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| **ऊस** | वाढीची | ➢ सहा ते आठ आठवडे वयाच्या आडसाली लागणीस को.८६०३२ जातीसाठी शिफारशीत (५००:२००:२०० किलो नत्र, स्फुरद व पालाश) खत मात्रेच्या ४० टक्के नत्र खताची दुसरी मात्रा द्यावी यासाठी २०० किलो नत्र (४३४ किलो युरिया) व इतर जातींसाठी शिफारशीत (४००:१७०:१७० किलो नत्र, स्फुरद व पालाश) नत्र खत मात्रेच्या ४० टक्के नत्र खताची दुसरी मात्रा द्यावी यासाठी १६० किलो नत्र (३४७ किलो युरिया) प्रती हेक्टरी याप्रमाणात द्यावे. खत मात्रा देताना ६ किलो युरियासाठी १ किलो निंबोळी पेंडीची भुकटी चोळून द्यावी. |
| **पशुधन** | "लम्पी" त्वचा रोग | **"लम्पी" त्वचा रोग कारणे**<br>➢ या रोगाचा संसर्ग "कॅप्रीपॉक्स" (Capri pox) विषाणू मुळे होतो. हा विषाणू शेळ्या व मेंढ्यांमधील देवी रोगाच्या विषाणूशी संबंधित आहे.<br>➢ पशुपालकांनी घ्यावयाची काळजी<br>➢ बाधित जनावरे निरोगी जनावरांपासून वेगळी ठेवणे.<br>➢ कोणत्याही संभाव्य रोगी जनावरास निरोगी जनावरांच्या कळपात प्रवेशास बंदी करणे.<br>➢ रोग प्रादुर्भाव झालेल्या गावातील बाधित व निरोगी जनावरांना चराऊ कुरणांमध्ये एकत्रित सोडण्यास मनाई करणे.<br>➢ डास, गोचिड व तत्सम किड्यांच्या बंदोबस्त करणे. तसेच, निरोगी जनावरांच्या अंगावर किडे न चावण्यासाठी औषध लावणे व गोठ्यामध्ये यासाठीच्या औषधांची फवारणी करणे.<br>➢ रोग प्रादुर्भाव क्षेत्रातील जनावरांना रोग प्रादुर्भाव नसलेल्या ठिकाणी तसेच स्थानिक बाजारांमध्ये नेण्यास प्रतिबंधक करणे.<br>**प्रतिबंधात्मक उपाय योजना**<br>➢ तत्काळ नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून उपचार करुन घ्यावेत.<br>➢ त्वचेवरील गाठीचे जखमेत रुपांतर झाल्यास जखमेत जंतू पडू नये यासाठी जखमेवर पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनानुसार औषध मलम लावावे.<br>➢ लम्पी या त्वचा रोग नियंत्रणासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने गोट पॉक्स या लसीचे लसीकरण करून घ्यावे. |

ठिकाण : २३.०९.२०२२

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**